# राष्ट्रीय सेवा योजना

## नियमित कार्यक्रम

- **उदबोधन शिबीर –**

१०/०८/२०१३ राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व व उदिष्टये, सामाजिक बांधिलकी, स्वयंसेवकांची जबाबदारी यासंदर्भात प्राचार्य डॉ. श्रीकांत गुप्ता, कार्यक्रम अधिकारी डॉ. अतुल कुलकर्णी, डॉ. सुजाता कसबे, डॉ. प्रफुल्ल श्येडये यांनी उद्‌बोधन व मार्गदर्शन केले.

- **अमृत वर्षा – भातलावणी –**

दि. २२/०७/२०१३ रोजी वेल्हा तालुक्यातील गावांमध्ये शेतक–यांना मदत म्हणून भात लावणीचा कार्यक्रम झाला. यामध्ये एकूण २७५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला व एकूण १४ एकर जागेवर भात लावण्यात आला.

- **झेंडावंदन पूर्व तयारी –**

दि. १४/०८/२०१३ रोजी झेंडावंदनाची पूर्व तयारी म्हणून मैदानावरील गवत काढण्यात आले. तसेच झेंडावंदानासाठी मैदानाची आखणी करण्यात आली.

- **मतदार नोंदणी अभियान** –

दि. १६ ते २५/०८/२०१३ या कालावधीत शिक्षण सहसंचालनालय, पुणे विद्यापीठ , परिवर्तन सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यामाने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी मतदार नोंदणी अभियान राबविण्यात आले.

१६ ते ३१/०१/२०१४ याकालावधीत महाराष्ट्र एज्यूकेशन सोसायटी, प्रबोधन मंच यांच्या संयुक्त विद्यामाने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी, तसेच समाजातील मतदारांसाठी मतदार नोंदणी अभियान राबविण्यात आले.

- **युवा चेतना दिन –**

दि. २२/०८/२०१३ रोजी युवा चेतना दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये श्री. शिरीष पटवर्धन सरांनी युवकांना मार्गदर्शन केले.

- **रक्षाबंधन –**

दि. ३१/०८२०१३ रोजी संस्कृती विद्यालय (मतिमंदांचे विद्यालय), पिरंगुट याठिकाणी जाउन तेथील मुलांना राखी बांधण्याचा कार्यक्रम घेण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांनी मुलांबरोबर काही सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

- **पोलिस मित्र व विशेष पोलीस अधिकारी –**

सार्वजनिक गणेश उत्सवात शांतता व सुरक्षितता राखण्याच्या दृष्टीने पुणे विद्यापीठ व पुणे पोलीस यांचे संयुक्त विद्यमाने उपक्रम घेण्यात आला. यामध्ये विद्यार्थ्यांना पोलीस मित्र म्हणून सहभाग घेतला. या विद्यार्थ्यांना पोलीस दला तर्फे ४ दिवसांचे विशेष प्रशिक्षण देण्यात आले. या पोलीस मित्रांनी गणेशोस्तव काळात पुणे पोलिसांना मदत केले. तसेच विशेष पोलीस अधिकारी म्हणून डॉ. श्येडये , प्रा. लांडगे यांनी तसेच कार्यालयीन कर्मचारी श्री. प्रसन्न गायकवाड, श्री. पावसे यांनी सहाकर्य केले.

- **मिशन मृत्युंजय –**

दि. ०२/०९/२०१३ रोजी पुणे पोलीस सहाकार्याने मिशन मृत्युंजय हे अभियान राबविण्यात आले.

- **स्वामी विवेकांनद जयंती निमित्त रॅली –**

दि. ११/०९/२०१३ रोजी स्वामी विवेकांनद जयंती निमित्त रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

- **आपत्ती व्यवस्थापन –**

दि. ०३/१२/२०१३ रोजी श्री. करमरकर यांचे आपत्ती व्यवस्थापन या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

- **युवा संकल्प दिन कार्यक्रम –**

दि. २८/१२/२०१३ रोजी युवा संकल्प दिन कार्यक्रमचे आयोजन करण्यात आले होते.

- **रक्तदान शिबीर –**

दि. ०८/०२/२०१४ रोजी जनकल्याण रक्तपेढीच्या मार्फत रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यामाध्यमातून २२ बाटल्या रक्तसंकलन करण्यात आले.

- **एडस् जनजागृती अभियान –**

दि.१०/०२/२०१४ रोजी पुणे विद्यापीठाच्या संयुक्त विद्यामाने व स्नेहालय संस्थेच्या सहकार्याने एडस् जनजागृतीचे आयोजन करण्यात आले होते.

- **मूल्य शिक्षण –**

पुणे विद्यापीठ व एस.पी. महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने घेतलेल्या मूल्य शिक्षण कार्यशाळेस महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी झाले होते.

- **विद्यापीठ स्तरीय शिबीरे –**

दि. ०९ ते १४ फेब्रु. २०१४ याकालावधीमध्ये फदालेवाडी, ता. आंबेगाव याठिकाणी पार पडलेल्या विद्यापीठ स्तरीय शिबीरात महाविद्यालयातील ७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ?

दि. २२ ते २७ फेब्रु. २०१४ याकालावधीत पारनेर याठिकाणी झालेल्या विद्यापीठ स्तरीय युवा चेतना शिबीरामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

डॉ. अतुल कुलकर्णी<br>
कार्यक्रम अधिकारी<br>
रा.से. योजना